**<u>प्रेसनोट</u>** दि. 02/11/2025

**अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे घटकाकडून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेत नेमणुकीस असलेले पोलीस उप निरीक्षक याचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय 48 वर्ष, |
| आरोपी लोकसेवकाचे नाव, पद, कार्यालय व वर्ग | प्रमोद रविंद्र चिंतामणी, वय 35 वर्ष, पोलीस उप निरीक्षक, नेमणूक आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, रा.फ्लॅट नंबर 504, सोपान रेसिडेन्सी, गंगोत्री पार्क,दिघी रोड,भोसरी,पुणे, मुळ कर्जुले हरियाळ ता.पारनेर,जि.अहिल्यानगर **(वर्ग-2)** |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | **रू. 2,00,000/-(दोन लाख रूपये)** |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम | **रू. 2,00,00,000/-(दोन कोटी रूपये)** |
| स्वीकारलेली लाच रक्कम | **रू. 46,50,000/-(सेहचाळीस लाख पन्नास हजार रूपये)** |
| पडताळणी दिनांक | दि. 27/10/2025 |
| सापळा दिनांक | दि. 02/11/2025 |
| ठिकाण | उंटाड्या मारुती मंदिरासमोर, रस्ता पेठ, पुणे शहर येथे |
| सापळा अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि., पुणे (मो.क्र. 9923444998) |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 9860667770) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे व्यवसायाने वकील असून त्यांचे आशील यांचेविरुद्ध बावधान पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. 256/2025, भा.न्या.सं.कलम 316(2), 316(5), 318(4), 336(2), 338,339, 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्या गुन्ह्यामध्ये आशियाच्या वडिलांना सुद्धा अटक झाली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद चिंतामणी यांच्याकडे आहे. सदर गुन्ह्यामध्ये तक्रारदारांच्या आशीलाला मदत करण्यासाठी व आशिलाच्या अटकेतील वडिलांच्या जामीन अर्जावर से दाखल करण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक प्रमोद चिंतामणी, पोलीस उप निरीक्षक हे तक्रारदाराकडे स्वतःसाठी 2 लाख रूपयांच्या लाचेची मागणी करत असल्याची तक्रार तक्रारदाराने लाच-लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दिली होती.

यातील तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 27/10/2025 रोजी ला.प्र.वि.पुणे विभागाकडून लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता पडताळणीमध्ये आलोसे यांनी तक्रारदार यांना त्यांच्या अशीलाला गुन्ह्यात मदत करण्यासाठी व त्या गुन्ह्यात अटकेत असलेले आशिलाचे वडील यांच्या जामीन अर्जावर से देण्यासाठी स्वतःसाठी दोन लाखाच्या प्राथमिक लाच मागणीमध्ये अचानकपणे वाढ करून दोन कोटी रूपयांची लाच मागितली त्यापैकी एक कोटी स्वतःसाठी व त्यांच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना एक कोटी असे दोन कोटी रूपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच आलोसे यांनी तक्रारदाराकडे वरील कारणासाठी मागितलेल्या दोन कोटी रूपयांच्या लाच रकमेपैकी 50 लाख रूपयांचा पहिला हप्ता लवकरात लवकर देऊन उर्वरित रक्कम टप्प्याटप्प्याने देण्याचे ठरल्याचे निष्पन्न झाले

वरील प्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर आज दि.2/11/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी लोकसेवक प्रमोद चिंतामणी वय 35 वर्ष, पोलीस उप निरीक्षक, नेमणूक -आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड आयुक्तालय यांनी उंटाड्या मारुती मंदिरासमोर,रस्ता पेठ, पुणे शहर येथे तक्रारदाराकडून लाच मागणी पडताळणी कारवाईदरम्यान मागितलेल्या दोन कोटी रकमेतील 50 लाखाच्या पहिला हप्ता रक्कमेपैकी 46,50,000/- रूपयाची लाच तक्रारदाराकडून स्वीकारली असता रंगेहात पकडण्यात आले त्यांच्याविरुद्ध समर्थ पोलीस स्टेशन ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क**

साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे),** 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.